उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी या कार्यालयीन इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामाच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०९१७/प्र.क्र.२३२/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १३ नोव्हेंबर २०१७

वाचा :

परिवहन आयुक्त यांचे क्र.काइबां (०८)/०११४/न.क्र.२७/का-१० (१)/जा.क्र.१०४५५, दि.१३.०७.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

रत्नागिरी जिल्ह्यातील वाहनांच्या संख्येत दरवर्षी होणारी वाढ, त्यामुळे शिकऊ अनुज्ञप्ती,वाहन चालविण्याची चाचणी, वाहनांची नोंदणी, वाहन तपासणी, वाहनांचे हस्तांतरण/ अन्य कामांच्या नोंदी घेणे इ. कामासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी येथे दररोज येणा-या जनतेची/वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये शिकाऊ/चालक अनुज्ञप्तीचे तसेच वाहनाचे सर्व प्रकारचे कामकाज संगणकाद्वारे करण्यात येतो. दैनंदिन कामाचे प्रमाण तसेच प्राप्त होणारे अभिलेख ठेवण्यासाठी सदर जागा अपुरी पडत असल्याने तसेच भविष्यात वाहनांच्या संख्येत होणारी वाढ व कामकाज पाहता, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी कार्यालयाच्या इमारतीवर पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्यासाठी तसेच त्यासाठीच्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, रत्नागिरी येथील इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्यासाठी सा.बां.विभागाने परिगणित केल्यानुसार पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Items	Norms (Unit Rate Rs.per Sqmt./Meter/Lumpsum etc.)	Cost Rs.
A	**Essential Items**		
1	**Building proper** **Scope** **(a)Area (Sqmt.) 924.72** **(b) Number of Floors GF** **(c)Foundation in B.C./Weak Soil** **(d) Cost of Construction**	**25000 Per Sqmt.**	**2,31,18,000** **2,31,18,000**

Sr. No.	Particulars of Items	Norms (Unit Rate Rs.per Sqmt./Meter/Lumpsum etc.)	Cost Rs.
2	**Electrification Internal** **External**	**5% of 1 (d)** **6% of 1 (d)**	**11,55,900** **13,87,080**
		Total	**25,42,980**
3	**Water Supply and Sanitation**	**5% of 1 (d)**	**11,55,900**
4	**Miscellaneous items** **Furniture 924.72** **Rain Water Harvesting** **Fire Fighting Arrangements** **Surafe Drains**	 **3000 Per Sqmt.** **Lump Sum** **Lump Sum** **Lump Sum**	 **27,74,160** **1,00,000** **1,00,000** **3,00,000**
		Total	**32,74,160**
	Sub Total (T) =(1)+(2)+(3)+(4)		**3,00,91,040**
	Contengencies	**4 % of 1 (d)**	**9,24,720**
	GST	**10% of 1 (T)**	**30,09,104**
		18% of 1 (T)	**54,16,387**
		Sub Total (A)	**3,94,41,251**
(B)	**OPTIONAL ITEMS**		
Sr.No.	**Items**		
1	**Water Main, Pump House etc.**		**10,00,000**
		Sub Total (B)	**10,00,000**
	TOTAL COST OF PROJECT (A)+(B)		**4,04,41,251**
	Say Rs. Lakhs		**404.41**

२. सदर मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा,मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदाकडून मंजूरी घ्यावी.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्रक्र.१७७/ता.क्र.१,दि.१० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाच्या नियतव्ययामधून भागविण्यात येईल.

इ) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रक विभागाच्या वतीने सक्षम अधिका-याकडून साक्षांकित करुन घेणे आवश्यक राहील.

ई) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.एच-८, मुख्य लेखाशीर्ष-४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (०१) कार्यालयीन इमारती (०८) परिवहन (योजनांतर्गत) (०८) (०१) मोठी बांधकामे (४०५९ ०८२३) ५३ मोठी बांधकामे” या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७५/इमा-२, दि.०३.१०.२०१७ नुसार तसेच, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-५, अ.क्र.३, व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल २०१७ मधील परिच्छेद क्र.७ नुसार असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११३१६२६३८४८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.11.13 16:30:18 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
७. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/ लेखा),परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी
११.उप सचिव (इमा) (सार्वजनिक बांधकाम विभाग)
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१३.निवड नस्ती, परि-४